# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

तक्रार क्र.१००८/२०१९/धाराशिव
(द्वितीय अपील क्र.२९२/२०१९मध्ये)

श्री.गोरे बब्रुवान नरसिंग,रा. मस्सा (ख.),ता.कळबं,जि.धाराशिव : तक्रारदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती कळबं,जि.धाराशिव : उत्तरवादी

निर्णय

(सुनावणी दि. ०८.११.२०२३)

तक्रारदार यांनी दि.१०.०६.२०१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे पुढीलप्रमाणे तक्रार दाखल केला आहे. "दि.०५.०३.२०१९ रोजी व्दितीय अपीलावर सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसाठी मी स्वत:हजर होतो. संबंधित जन माहिती अधिकारी हजर होते.त्यावेळी संबधित अधिकारी यांनी मला आयोगासमक्ष कुठल्याही स्वरुपाची माहिती दिलेली नाही. तरी आपण दि.०५.०३.२०१९ रोजी आपण सुनावणीमध्ये घेतलेल्या निर्णयामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मला माहिती आपल्यासमोर दिली, असा उल्लेख दिसुन येत आहे. त्या बाबत माझे म्हणणे असे आहे की, सुनावणीच्या दिवशी मला आपल्या समोर संबधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. त्यानंतर गटविकास अधिकारी व संबंधीत जन माहिती अधिकारी व विभागाचे अधिकारी यांनी मला दि.२०.०३.२०१९ रोजी दिली. ती माहितीही अपुर्ण आहे. त्या संदर्भात मी आपल्याकडे कलम१८ नुसार तक्रार दाखल करीत आहे."त्यामुळे संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.२९२/२०१९ मध्ये दि.०५.०३.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते. " जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती मग्रारोहयो विभागाकडून प्राप्त करुन घेऊन आज रोजी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देण्याकरिता आज सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निदेशानुसार ती अपीलार्थी यांना देण्यात आली.अपिलार्थी यांनी ती आयोगासमोर स्वीकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षातप्रत येऊन आयोग येत आहे, असा आदेश पारित केला आहे. "

सदर प्रकरणावर अनुक्रमे दि.२८.१२.२०२०, दि.२८.०६.२०२१, दि.१५.०६.२०२३ दि.१२.०६.२०२३रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी घेण्यात आली होती,सदरील सुनावणी परिपूर्ण न झाल्यामुळे पुढील सुनावणीला व्यक्तिश: उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी श्री.विष्णु दतोबा बोंदर,तत्कालीन व विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना दि.०३.०८.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

त्यानुसार श्री.विष्णु दतोबा बोंदर तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी तथा पंचायत समिती कळंब जि.धाराशिव यांनी दि.२१.०८.२०२३ रोजी खुलासा सादर केला की, तक्रारदार यांना मागणी केल्यानुसार उर्वरित माहिती दिनांक ८.०७.२०२१ रोजी दिल्याचे तसेच सदर माहिती मिळालेबाबत तक्रारदार यांनी लेखी पोहच दिली आहे. व तक्रारदार श्री.गोरे बब्रुवान नरसिंग रा.मस्सा (खं) ता.कळंब यांनी त्यानी मागणी केलेली संपुर्ण माहिती मिळाल्यामुळे कसल्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही, अशी पोचही दिलेली असल्याने, कृपया विनंती की माझ्या खुलाशाचा सहानभुतीपुर्वक विचार करावा.व खुलासा मान्य करावा, हि विनंती केली आहे.त्यांच्या खुलाशात तथ्यांश दिसुन येतो. तसेच तक्रारदाराची पोचही प्राप्त झालेली असल्याने त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आज दि.०८.११.२०२३ रोजी सुनावणीच्यावेळी श्री.विष्णु दतोबा बोंदर,तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी तथा पंचायत समिती कळंब जि.धाराशिव व श्री.गोरे बब्रुवान नरसिंग रा.मस्सा (खं) ता.कळंब हे सुनावणीसाठी उपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान श्री.गोरे बब्रुवान नरसिंग सुचित केले की, त्यांचे दि.१५.०६.२०२३ रोजी पत्रान्वये आयोगास त्यांना आवश्यक असलेली माहिती गटविकास अधिकारी पंचायत समितीचे कळंब यांचे पत्र दि.०८.०७.२०२१अन्वये माहिती मिळालेली आहे. असे कळविलेले आहे. त्यामुळे माहिती मिळणे बाबत आता माझी कसल्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही. तरी माझी तक्रारीचे प्रकरण अंतिमरीत्या निकाली काढण्यात यावे,अशी विनंती आयोगास केली आहे,

यावरुन तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच तक्रारदार यांनी सूचित केले की, त्यांची तक्रार अंतिमरीत्या निकाली काढण्यात यावे,अशी विनंती केली आहे. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारदार यांना माहिती मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाला तक्रार निकाली काढण्याविषयी विनंती केल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.१००८ /२०१९/धाराशिव /एबीजे/जावक क्र.19754 /२०२३ दिनांक : 26/12/2023